नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २६९ | Issue - 269 | वार बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६ | Blow- Wednesday Date 18 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ग्रामपंचायत निवडणुकांचा बिगुल वाजले

## मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसह, नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग (वॉर्ड) रचनेचा कार्यक्रम घोषित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना आता वेग येणार आहे. जिल्हा परिषद निवडणुकानंतर आता ग्रामपंचायत निवडणुकांचा बिगुल वाजलं आहे. जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसह, नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य शासनाने प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम घोषित केला आहे. यानुसार, येत्या २० फेब्रुवारी २०२६ पासून प्रभाग रचनेच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

ग्रामविकास विभागाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले असून, संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

असा असेल प्रभाग रचनेचा



'थ्री-स्टेप' प्लॅन प्रभाग रचनेचे काम प्रामुख्याने तीन टप्प्यांत पार पडणार आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर देण्यात आला आहे.

**पहिला टप्पा (नकाशे निश्चिती):**

तहसीलदार 'गुगल अर्थ'च्या साहाय्याने २० फेब्रुवारीपर्यंत गावांचे नकाशे अंतिम करतील.

**दुसरा टप्पा (प्रत्यक्ष पाहणी):**

२७ फेब्रुवारीपर्यंत संबंधित तलाठी आणि ग्रामसेवक प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन पाहणी करतील आणि प्रभागांच्या सीमा निश्चित करतील.

**तिसरा टप्पा (मान्यता):**

जिल्हाधिकाऱ्यांच्या तपासणीनंतर २३ मार्च २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोग या प्रस्तावांना अंतिम मान्यता देईल.

**हरकती आणि सुनावणीचे वेळापत्रक**

नागरिकांना प्रभाग रचनेबाबत आपले मत मांडण्याची संधी मिळावी, यासाठी प्रशासनाने पारदर्शक वेळापत्रक ठरवले आहे.

प्रारूप प्रसिद्धी : ७ एप्रिल २०२६ रोजी प्रभाग रचनेचा मसुदा (प्रारूप) जाहीर केला जाईल.

हरकतींची मुदत: नागरिकांना ७ ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत आपल्या हरकती किंवा सूचना नोंदवता येतील.

सुनावणी : प्राप्त झालेल्या हरकतींवर २१ एप्रिलपर्यंत उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सुनावणी पार पडेल.

**४ मे रोजी होणार अंतिम घोषणा**

सर्व हरकतींचा निपटारा केल्यानंतर आणि प्रस्तावांची पडताळणी पूर्ण झाल्यावर, जिल्हाधिकारी २८ एप्रिलपर्यंत अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करतील. त्यानंतर, ४ मे २०२६ रोजी अधिकृतरीत्या अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाणार आहे. या प्रक्रियेमुळे आगामी काळात गावपातळीवरील निवडणुकांचे चित्र स्पष्ट होणार असून, राजकीय इच्छुकांनी आतापासूनच मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.

# अक्कलकोट तालुक्यातील दळणवळणाला मिळणार नवी दिशा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतभरातील स्वामी भक्तांसाठी अत्यंत उत्साहाची बातमी आली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांनी सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-बी च्या भुरीकवठे-वागदरी-अक्कलकोट-नागणसूर-तोळनूर ते महाराष्ट्र-कर्नाटक राज्यसीमा सेक्शनच्या रुंदीकरणासाठी ३५३.२३ कोटी रुपयांच्या तरतुदीसह मंजुरी प्रदान केली आहे. सदर कामाच्या मंजुरीसाठी अक्कलकोटचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी सतत पाठपुरावा केले आहे



### आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या पाठपुरावाला यश

**काय आहेत प्रमुख वैशिष्ट्ये?**

- **४७.६६३ किमी रस्त्याचे रुंदीकरण (भुरीकवठे-वागदरी-अक्कलकोट-नागणसूर-तोळणूर ते महाराष्ट्र-कर्नाटक सीमा).**
- **वागदरी येथे बायपास रस्त्याचे नियोजन.**
- **सांगवी येथे नव्या पुलाच्या बांधकामाला मंजुरी.**

या प्रकल्पांतर्गत एकूण ४७.६६३ किमी लांबीच्या मार्गाचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. प्रकल्पामध्ये वागदरी येथे बायपास व सांगवी येथे पुलाच्या बांधकामास देखील मंजुरी देण्यात आली आहे.

या मार्ग प्रकल्पामुळे कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमधून येणारी जड वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुरळीत तर होणार आहेच पण या मार्गामुळे लातूर, उमरगा तसेच आंध्र प्रदेश येथील स्वामी भक्त आणि भाविकांना अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी प्रवास करणे अधिक सुलभ होणार आहे. अर्थातच अक्कलकोटच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची ठरणारी ही घटना आहे. ट्रिपल इंजिन सरकारमुळे अक्कलकोटचे भवितव्य दिवसेंदिवस अधिक भरभराटीचे होताना दिसून येत आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे मन:पूर्वक आभार!!

# एआय सुपरपॉवरमध्ये भारत असावा : नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी (छरीशपवीर चेवळ) यांनी इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ च्या निमित्तानं तंत्रज्ञान आणि एआय संदर्भात एक मुलाखत दिली आहे. एएनआय या वृत्तसंस्थेनं नरेंद्र मोदी यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत मोदी यांनी तंत्रज्ञान हे मनुष्य सेवेसाठी असावं, माणसांची जागा घेण्यासाठी नव्हे, असं म्हटलं. जागतिक विकासाला मानवकेंद्री ठेवत एआयनं प्रोत्साहन दिलं पाहिजे, असं पंतप्रधानांनी म्हटलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी एआय संदर्भात बोलताना म्हणाले की तंत्रज्ञानाचं अस्तित्व माणसांच्या सेवेसाठी असावं त्यांची जागा घेण्यासाठी नसावं. आमचं व्हिजन स्पष्ट आहे, जागतिक विकासाला एआयनं प्रोत्साहन देताना सखोलपणे मानवकेंद्री असलं पाहिजे. आम्ही फक्त टॅलेंट विकसित करत नसून इन्फ्रास्ट्रक्चर, धोरण यंत्रणा आणि एआय क्रांतीत भारतानं सहभागी व्हाव यासाठी आवश्यक कौशल्य विकसित करण्यावर काम करतोय, असं मोदी म्हणाले.

मोदी पुढं म्हणाले की, आम्हाला आयटी क्षेत्र फक्त सेवा क्षेत्रात नकोय त्यांनी एआय उत्पादनं, एआय प्लॅटफॉर्मसाठी काम करावं, ज्यानं भारत आणि जगाला सोल्यूशन्स मिळतील, असं मोदींनी सांगितलं. माझ्या मते एआय हे ऊर्जा कित्येक पटीनं वाढवणारं असेल ज्यामुळं जितक्या सीमा किंवा मर्यादा असतील त्या दूर करता येतील. माझ्या व्हिजन नुसार भारत जगातील तीन प्रमुख एआय सुपरपॉवर्समध्ये असावा. तो देखील एआयच्या वापरतात नाही तर एआयच्या निर्मितीत, असं मोदींनी म्हटलं. आपल्या एआय मॉडेलचा वापर जगभरात झाला पाहिजे, अब्जावधी लोकांनी त्यांच्या स्थानिक भाषांमध्ये वापर करावा. आपल्या एआय स्टार्टअपचं मूल्य शेकडो अब्ज असेल, ज्यातून दशलक्ष नोकऱ्या उपलब्ध होतील, असंही मोदींनी म्हटलं.

डिजिटल शतकात आत्मनिर्भर भारत म्हणजे एआय मध्ये भारतानं आपला स्वत:चा कोड लिहायला हवा. इंडिया एआय मिशन द्वारे आपल्या कोडमधून आपणं आपली मूल्य, आपल्या लोकांची सेवा करु याशिवाय जबाबदार एआय नेतृत्त्व म्हणून जगात भारताचं स्थान असेल. आपलं ध्येय स्पष्ट आहे. मनुष्य केंद्रीत जागतिक विकासाला एआयनं गती दिली पाहिजे, असं मोदी म्हणाले.

जगभरात एआयमुळं दरी वाढण्याची भीती असताना भारत मात्र एआयच्या वापरानं ती दरी कमी करण्याचं काम करेल, असं मोदींनी म्हटलं. भारताकडे बुद्धिमत्ता असून उद्योजकीय ऊर्जा असून त्याद्वारे एआय पॉवरहाऊस होण्याची क्षमता आपल्याकडे आहे. आपण एआयचे ग्राहक नाही तर निर्माते असू असं मोदी म्हणाले.

आपल्या प्रत्येक प्रयत्नातून आपल्या बुद्धिमान तरुणांनी एआयचा वापर ऊर्जेचा त्यांच्या शक्तीची क्षमता वाढवण्यासाठी करावा. ज्यामध्ये नाविन्यता आणि सर्वसमावेशकता असावी, असं मोदी म्हणाले. एआयमुळं मानवी क्षमता वाढतील. मानवकेंद्रीत निर्णय घेण्याची जबाबदारी देखील वाढेल, असं मोदींनी म्हटलं. एआयमधील सर्वसामान्य मूल्य आणि दर्जा सांभाळण्यासाठी जगानं एकत्र काम केलं पाहिजे, असं मोदी म्हणाले.

तंत्रज्ञानामुळं काम पुसलं जाऊ नये. त्याचं स्वरुप बदललं जाईल आणि नव्या नोकऱ्या निर्माण होतील, असंही मोदींनी म्हटलं. इतिहासानं आपल्याला शिकवलं आहे, जेव्हा नाविन्यता निर्माण होते, नव्या संधी निर्माण होतात. एआयच्या जगात देखील तेच सत्य आहे. एआय संदर्भात आत्मनिर्भर भारताचा विचार केला असता तीन स्तंभ महत्त्वाचे आहेत. सार्वभौमत्व, सर्वसमावेशकता आणि नाविन्यता असं मोदींनी म्हलं. एआय मध्ये आत्मनिर्भर भारत म्हणजे डिजिटल शतकात भारतानं स्वत:चा कोड लिहिणं होय, असं मोदी म्हणाले.

## हर्षवर्धन सपकाळांकडून शिवप्रेमींची दिलगिरी; भाजपचा खोडसाळपणा म्हणत वक्तव्याचा अर्थही समजावला

मुंबई : राज्यात शिवजयंतीची जल्लोष आणि उत्साहात तयारी सुरू असून शिवप्रेमी, शिवभक्त तयारीला लागले आहेत. मात्र, दोन दिवसांपूर्वी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना शिवाजी महाराजांबद्दल केल्याच्या वक्तव्यावरुन चांगलाच वाद सुरू झाला. भाजप नेते, आमदारांकडून हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर टीका करत काँग्रेसचा खरा चेहरा हाच आहे, काही विशिष्ट समुदायाच्या व्होट बँकेसाठी हर्षवर्धन सपकाळ असं बोलतात असेही सत्ताधाऱ्यांनी म्हटले. मात्र, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला, भाजपने जाणीवपूर्वक खोडसाळपणा केल्याचं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. तसेच, आपल्या वक्तव्याने काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असेही सपकाळ यांनी म्हटले. हर्षवर्धन सकपाळ यांनी शिवाजी महाराजांबद्दल गौरवोद्गार काढताना टिपू सुलतानच्या कार्याचेही कौतुक केले होते. तसेच, शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानसोबत केल्याचं दिसून आलं. मात्र, भाजपने खोडसाळपणा करत चुकीच्या पद्धतीने माझे वक्तव्य पसरवल्याचे सांगत आपल्या वक्तव्याबद्दल हर्षवर्धन सपकाळ यांनी शिवप्रेमीप्रती केली दिलगिरी व्यक्त केली आहे.

## देशातील पहिल्या मुंबई क्लायमेट वीकचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन




# हवामान बदल कृती कार्यक्रमाला मुंबई क्लायमेट वीकमुळे मिळणार वेग; कृती कार्यक्रमाच्या नेतृत्वासाठी महाराष्ट्र तयार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हवामान बदलाच्या वाढत्या आव्हानांना उत्तर देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कृती आवश्यक असून मुंबई क्लायमेट वीक हा त्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. हवामान बदलावरील कृती कार्यक्रमाचे नेतृत्व करण्यास महाराष्ट्र तयार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. हवामान कृती ही केवळ पर्यावरणीय जबाबदारी नसून भविष्यातील आर्थिक स्पर्धात्मकतेची किल्ली असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुंबई क्लायमेट वीकचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, मुंबईच्या महापौर रितू तावडे, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण कार्यक्रम विभागाचे संचालक मार्टिन क्रुसे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुंबईसारख्या किनारी महानगराला हवामान बदलाचा फटका बसत आहे. अतिवृष्टीमुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणे, घरे पाण्याखाली जाणे, व्यवसाय ठप्प होणे आणि उपजीविकेवर परिणाम होणे ही परिस्थिती वारंवार दिसत आहे. उष्णतेच्या लाटांचा परिणाम बांधकाम कामगार, फेरीवाले आणि शेतकरी यांच्यावर होत आहे. ग्रामीण भागात अवकाळी पावसामुळे कापणी केलेली पिके नष्ट होतात, ज्याचा मोठा आर्थिक व सामाजिक परिणाम होतो. त्यामुळे हवामान बदल हा आज प्रशासनासमोरील गंभीर प्रश्न बनला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने आर्थिक विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधण्याचा मार्ग स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. देशाने अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात झपाट्याने प्रगती केली असून स्वच्छ ऊर्जेच्या विस्तारामुळे भारत जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. महाराष्ट्रही या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सध्या राज्यात मोठ्या प्रमाणावर ऊर्जा क्षमता उभारण्यात आली असून २०३० पर्यंत हरित ऊर्जेचा वाटा ५० टक्क्यांहून अधिक करण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी स्वच्छ हायड्रोजन, इलेक्ट्रिक वाहतूक, जैवइंधन आणि शाश्वत पायाभूत सुविधांवर भर दिला जात असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र हवामान कृतीकडे केवळ नियमांचे पालन म्हणून पाहत नाही, तर ती गुंतवणूक, नवकल्पना आणि रोजगारनिर्मितीची मोठी संधी मानतो. जागतिक भांडवल शाश्वत बाजारपेठांकडे वळत असून कमी कार्बन तंत्रज्ञानामुळे स्वच्छ उपाय अधिक परवडणारे होत आहेत. जे राज्य वेगाने बदल स्वीकारतील, ते भांडवल आणि कौशल्य आकर्षित करतील. महाराष्ट्र या परिवर्तनाचे नेतृत्व करेल.

राज्यात औद्योगिक क्षेत्रात अक्षय ऊर्जेचा वापर वाढवणे, शहरांमध्ये इलेक्ट्रिक मोबिलिटीला चालना देणे, सार्वजनिक वाहतूक व लॉजिस्टिक प्रणाली अधिक पर्यावरणपूरक करणे यावर भर दिला जात आहे. पूरनियंत्रण व्यवस्था, हवामान स्मार्ट नागरी नियोजन आणि डेटा आधारित अंदाज प्रणाली विकसित करण्याचे काम सुरू आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील मोठ्या पायाभूत प्रकल्पांमध्ये सुरुवातीपासूनच शाश्वतता आणि आपत्ती प्रतिकारक्षमता यांचा समावेश केला जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

हवामान कृती ग्रामीण भागातही तितकीच महत्त्वाची असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बदलत्या पावसाच्या पद्धती, पाण्याचा ताण आणि किनारी भागातील धोके लक्षात घेऊन हवामान प्रतिरोधक शेती, कार्यक्षम जलव्यवस्थापन आणि तंत्रज्ञानाधारित ग्रामीण मूल्यसाखळी विकसित करण्यावर भर दिला जात आहे. हा बदल पुढील पिढ्यांसाठी आर्थिक संधी निर्माण करेल.

हवामान बदलासाठी आवश्यक असलेली मोठी गुंतवणूक केवळ सार्वजनिक निधीतून शक्य नसल्याचे सांगत त्यांनी आंतरराष्ट्रीय वित्त संस्था आणि खासगी क्षेत्राला सहकार्याचे आवाहन केले. मिश्र वित्त, जोखीमवाटप आणि नवतंत्रज्ञानासाठी भांडवल यांची गरज अधोरेखित करत मुंबई जागतिक हवामान वित्तासाठी प्रभावी केंद्र बनू शकते. हवामान न्याय ही संकल्पनाही तितकीच महत्त्वाची असून विकसनशील देशांना विकास आणि पर्यावरण यापैकी एकाची निवड करण्यास भाग पाडता कामा नये. योग्य भागीदारीतून दोन्ही उद्दिष्टे साध्य होऊ शकतात, असे मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी सांगितले.

हवामान कृती ही घोषणांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीत दिसली पाहिजे, असे सांगत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, ऊर्जा निर्मिती, प्रदूषण नियंत्रण, शहरांचे संरक्षण आणि शेतकऱ्यांना मदत या सर्व बाबतीत ठोस कामगिरी आवश्यक आहे. मुंबई क्लायमेट (पान २ वर...)

## संपादकीय....

### राज्याची भरारी

हवामान बदलाच्या वाढत्या आव्हानांना उत्तर देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कृती आवश्यक असून मुंबई क्लायमेट वीक हा त्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. हवामान बदलावरील कृती कार्यक्रमाचे नेतृत्व करण्यास महाराष्ट्र तयार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच सांगितले. हवामान कृती ही केवळ पर्यावरणीय जबाबदारी नसून भविष्यातील आर्थिक स्पर्धात्मकतेची किल्ली आहे. मुंबईसारख्या किनारी महानगराला हवामान बदलाचा फटका बसत आहे. अतिवृष्टीमुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणे, घरे पाण्याखाली जाणे, व्यवसाय ठप्प होणे आणि उपजीविकेवर परिणाम होणे ही परिस्थिती वारंवार दिसत आहे. उष्णतेच्या लाटांचा परिणाम बांधकाम कामगार, फेरीवाले आणि शेतकरी यांच्यावर होत आहे. ग्रामीण भागात अवकाळी पावसामुळे कापणी केलेली पिके नष्ट होतात, ज्याचा मोठा आर्थिक व सामाजिक परिणाम होतो. त्यामुळे हवामान बदल हा आज प्रशासनासमोरील गंभीर प्रश्न बनला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने आर्थिक विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधण्याचा मार्ग स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. देशाने अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात झपाट्याने प्रगती केली असून स्वच्छ ऊर्जेच्या विस्तारामुळे भारत जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. महाराष्ट्रही या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

## हवामान बदल कृती कार्यक्रमाला मुंबई क्लायमेट वीकमुळे मिळणार वेग; कृती कार्यक्रमाच्या नेतृत्वासाठी महाराष्ट्र तयार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..) वीक हा चर्चेचा मंच न राहता कृतीचा मंच ठरावा, गुंतवणूकयोग्य प्रकल्प आणि अंमलात येणाऱ्या भागीदाऱ्या निर्माण व्हाव्यात. हवामान कृती ही आपल्या पिढीची मोठी आर्थिक संधी ठरू शकते.

**पीएम कुसुम योजनेत महाराष्ट्राची कामगिरी प्रभावी, राज्याला आणखी १ लाख पंप देणार : केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी**

नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा व पीएम कुसुम योजनेमध्ये महाराष्ट्राने अतिशय प्रभावी कामगिरी केली आहे. यामुळे पीएम कुसुम योजनेतील महाराष्ट्राच्या कामगिरीची दखल घेत महाराष्ट्रसाठी आणखी एक लाख पंप मंजूर करण्याची घोषणा केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी यावेळी केली.

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, हवामान कृतीसाठी शासन, शहर संस्था आणि नागरिक यांची भागीदारी आवश्यक असून युवकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे.

# प्रथम छत्रपती: शिवाजीराजे भोसले!

## (१९-२५ फेब्रुवारी: शिवजन्मोत्सव सप्ताह विशेष.)



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्रच नव्हे तर अख्ख्या भारताचे लाडके छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवरायांचा जन्म दिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. शिवाजीरिजे आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजीराजे यांचा संयुक्त नामोल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वसाधारणपणे इतिहासकार शिवाजी महाराजांचा जन्म- १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू- १७०७ या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात. शिव छत्रपतींबद्दल पुरेपूर माहिती लिहिण्याची आपली काय औकात? असे म्हणत श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांनी शब्दबद्ध केलेले काही प्रसंगच वाचकांच्या सेवेत... संपादक.

शिवाजी महाराजांच्या जयंतीला महाराष्ट्रात 'शिवजयंती' म्हणतात. ती राज्यभर एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरी केली जाते. त्यांच्या जन्म दिनांकाबद्दल वाद असल्याने शिवजयंती महाराष्ट्रात वर्षभरात किमान दोनदा तरी साजरी होते. त्या दिवशी दिवसभर ढोल-ताशे वाजवीत मिरवणुका निघतात आणि शिवाजीच्या पुतळ्यांना हार घालण्याचा कार्यक्रम होतो. अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी जी कालगणना प्रचलित होती त्यानुसार शिवाजी जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. सन २००१ सालापासून १९ फेब्रुवारी या तारखेला सरकारी शिवजयंती साजरी होते. छत्रपती शिवाजीराजे भोसले, जे शिवराय म्हणूनही जगविख्यात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचे कोणतेही पुस्तक पाहिले तर मुखपृष्ठ हे छत्रपती शिवाजी महाराजांचेच दिसेल. कारण ते येथील मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य महाराजांनी उभे केले आणि इ.स.१६७४मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल-इतिहासाचे ज्ञाते, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्चीकरणात नेमके हल्ले, यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे हाताळले होते. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर त्यांनी उभे केले. किनारे आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले होते.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३० रोजी छ.शिवाजी महाराजांचा जन्म झाला. इतिहासाच्या अभ्यासांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा एकेकाळी मतभेदांचा मुद्दा होता. तो वाद नंतर मिटला. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ अर्थात शुक्रवार दि.१९ फेब्रुवारी १६३० ही शिवरायांची जन्मतारीख २००१ साली स्वीकारली. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७- वैशाख शुद्ध तृतीया ही एक जन्मतारीख मानली जात होती. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला माता जिजाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. त्यांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. आई जिजाई छोट्या शिवबासह पुण्यात रहायला गेल्या. त्यावेळी पुण्याची फार दुरवस्था झालेली होती. तेव्हा छोटे शिवराय व कारभारी यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतीकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून पुण्याची पुनःस्थापना करायला सुरुवात केली. शिवाजीराजे लहानाचे मोठे होत असताना आणि त्यानंतरही प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजामातेनी खंबीर मार्गदर्शन केले. शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू होत. हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला त्यांना जिजाऊंनी स्फूर्ती दिली, असे काही इतिहासकार सांगतात. युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजी राजांकडून दप्तर व न्यायव्यवस्थेचे शिक्षण, परकीय सत्तेविरूद्ध लढा देण्यात आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण माता जिजाऊकडून मिळाले, असे उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरून निश्चितपणे सांगता येते. जिजाऊंनी शिवबांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युद्धकला व राजनीतिशास्त्राचे शिक्षण देवविले. शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूड आदींच्या माध्यमातून त्यांच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले.

शिवरायांची राजमुद्रा: छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. ती अशी- प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते! त्याचा मराठी अर्थ- ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो. तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल!

पन्हाळगडापासून काही अंतरावर वाटेत सिद्दीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत गाठले आणि हातघाईची लढाई सुरू झाली. तेव्हा शिवाजीराजांचे विश्वासू पराक्रमी सरदार बाजीप्रभु देशपांडे यांनी शिवाजीराजांना विनंती केली, की त्यांनी विशालगडासाठी पुढे कूच करावी. खिंडीतील लढाई ते स्वतः लढतील. विशालगडावर पोहोचताच तोफांच्या तीन डागण्या ऐकू आल्या म्हणजे शिवाजीराजे सुखरूप गडावर पोहचले, असा संदेश मिळेल. बाजीप्रभु देशपांडे- यांनी वचन दिले, की जोपर्यंत तोफांचे तीन आवाज ऐकू येणार नाहीत, तोपर्यंत सिद्दी जौहरला खिंडीमध्येच झुंजवत ठेवतील. महाराजांना ते पटेना, पण बाजीप्रभूंच्या विनंतीवजा हट्टापुढे त्यांनी यास मान्यता दिली आणि विशालगडासाठी कूच केली. बाजींनी सिद्दीच्या सैन्याला रोखून धरण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली, परंतु संख्येने कितीतरी पटीने अधिक सैन्यापुढे त्यांनी प्राणांची बाजी लावली. ते स्वतः प्राणांतिक रितीने घायाळ झाले होते. शेवटी सैनिकांनी मृत्युपथावर असलेल्या घायाळ बाजींना एके ठिकाणी आणून बसविले, मात्र बाजीप्रभूंचे प्राण कानाशी साठले होते. थोड्या वेळाने तोफांचे तीन आवाज ऐकू आले आणि शिवाजीराजे गडावर पोहोचल्याचा तो संदेश समजल्यावरच बाजीप्रभूंनी प्राण सोडले. शिवाजीराजांना ही बातमी फार चटका लावून गेली. बाजीप्रभू हे ज्या घोडखिंडीत लढले आणि स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले त्या घोडखिंडीचे नाव त्यांनी पावनखिंड असे बदलले. बाजीप्रभूंच्या बलिदानाने पावन झालेली ती पावनखिंड होती.

मोगल साम्राज्याचा नर्मदा नदीपलीकडे विस्तार करणे, तसेच शिवाजी महाराजांच्या राज्यविस्ताराला वेसण घालणे या दोन हेतूंसाठी औरंगजेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान याला दख्खनच्या मोहिमेवर पाठविले. प्रचंड मोठा लवाजमा, सैन्य आणि फौजफाटा सोबत घेऊन शाहिस्तेखान निघाला आणि वाटेत असणाऱ्या प्रत्येक राज्यात, गावात त्याने दहशत पसरवीत जमेल तेवढा जमेल तेथे विध्वंस केला. शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील शिवरायांच्या लाल महालातच तळ ठोकला. महाराजांनी खानाचा बंदोबस्त करण्यासाठी एक धाडसी निर्णय घेतला. तो म्हणजे लाल महालात शिरून खानाला संपविण्याचा! लाल महालात आणि अवतीभोवती खडा पहारा आणि महालात शिरणे अतिशय जोखमीचे काम होते. एके रात्री जवळूनच जाणाऱ्या एका लग्नाच्या मिरवणुकीचा आधार घेऊन काही मोजक्या माणसांसह स्वतः शिवाजी महाराज लाल महालात शिरले. महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष शाहिस्तेखानच्या खोलीत त्यांनी प्रवेश केला. तोपर्यंत महालात कोठेतरी झटापट सुरू झाल्यामुळे शाहिस्तेखानला जाग आली. तेवढ्यातच त्यांना समोर पाहून खानाने जीव वाचविण्यासाठी सरळ खिडकीतून खाली उडी घेतली. महाराजांनी चपळाईने केलेला वार हुकल्यामुळे खानाच्या प्राणावर बेतण्याऐवजी त्याची हाताची तीन बोटे कापली गेली. अनेकदा या गोष्टीचा अप्रत्यक्ष फायदा शिवराय किंवा त्यांच्या सैन्याला मिळाला. शत्रू सैन्यामध्ये ते घुसल्याच्या केवळ अफवा पसरवून संख्येने किरकोळ असलेल्या मावळ्यांनी संख्येने अनेक पटींनी मोठ्या सैन्याची उडविलेली दाणादाण ही याच गोष्टीची साक्ष देऊ शकते. इ.स.१६६३ सालचे शाहिस्तेखान प्रकरण शिवाजीराजांच्या जीवनात आणखी एका नाट्यमय प्रसंगाची भर घालून गेले.

शिवछत्रपतींच्या अशा अनेकानेक पराक्रमी व विजयी घोडदौडी झाल्या. त्यानंतर प्रदीर्घ आजारपणामुळे छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू दि.३ एप्रिल १६८० रोजी रायगड येथे झाला, असे सांगितले जाते.

!! शिवजयंती निमित्ताने शिव छत्रपतींना मानाचा मुजरा व सर्वांना प्रेरणादायी शिवमय हार्दिक शुभेच्छा!!

**– संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉट्सप. नं. ९४२३७१४८८३.**

# कळंब येथील शिवजयंती उत्सवास शिवशाहीर संतोष साळुंखे यांच्या शाहीर महाराष्ट्राचा या कार्यक्रमाने सुरुवात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : शिव सेवा तालीम संघ कळंब आयोजित भव्य शिवजयंती महोत्सवात १५ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवशाहीर संतोष साळुंखे व सहकारी कलाकार यांचा शिवचरित्र पोवाडे व स्फूर्ती गीतांचा शाहीर महाराष्ट्राचा हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन कळंबच्या नगराध्यक्षा सौ.सुनंदा कापसे यांच्या शुभहस्ते व कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिवाजी आप्पा कापसे , कळंब शहरातील पत्रकार , सतीश बप्पा टोणगे, दिलीप गंभीरे, शितल घोंगडे, मुस्तान मिर्झा, परमेश्वर पालकर, प्राचार्य जगदीश गवळी,माधवसिंग राजपूत ,मंगेश यादव, प्रदीप यादव, शिवप्रसाद बियाणी, शिवाजी सावंत,यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती पूजन , राष्ट्रमाता जिजाऊ, व महामानवांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली, कुमारी सई बाकले या विद्यार्थिनीने जिजाऊ वंदना गायन केली, प्रास्ताविक सुशील कुमार तीर्थकर अध्यक्ष शिव सेवा तालीम संघ शिवजयंती उत्सव समिती कळंब यांनी केले तर प्रमुख पाहुणे यांचा सत्कार शाल, पुष्पगुच्छ देऊन शिवसेना तालीम संघ शिवजयंती महोत्सव समिती कळंब चे अध्यक्ष सुशील कुमार तीर्थकर, अरेफ भाई तांबोळी, बापू कदम, मनोज कदम, विकास गडकर, नितीन गरड, नामदेव पौळ, राजाभाऊ गरड यांनी केले. शिवशाहीर संतोष साळुंखे यांनी शिवचरित्र पोवाड्यातून छत्रपती शिवरायांचा इतिहास आपल्या बहारदार व पहाडी गायनातून उभा केला. त्यांनी गरजा - जय - जय महाराष्ट्र माझा ! हे महाराष्ट्र गीत तसेच वाजवा संबळ, हलगी, शिवरायांची पालखी आली हे गीत कळंब येथे पहिल्यांदा सादर केले. तसेच यातून पारंपारिक वाद्य वाजवा, डॉल्बी. डीजे. टाळा असा संदेश दिला, त्याच बरोबर शिवजन्माचा पोवाडा, किल्ले रायगड महाराष्ट्राची शान आदी पोवाडे व स्फूर्ती गीते सादर करण्यात आली. या गीतांनी रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशील कुमार तीर्थकर, संचलन प्राचार्य महादेव गपाट यांनी केले. शिव सेवा तालीम संघ कसबा पेठ कळंब आयोजित भव्य शिवजयंती उत्सवात दि.१६ फेब्रुवारी २०२६ रोजी व्याख्याते प्रदीप साळुंखे यांचे मन करा रे प्रसन्नया विषयावर व्याख्यान,१७ फेब्रुवारी रोजी विशाल गरड यांचे शिवचरित्रातून महिला सबलीकरण या विषयावर व्याख्यान होणार आहे. तर १८ फेब्रुवारी२०२६ रोजी संस्कृती महाराष्ट्राची पुणे हा अस्सल मराठी बाणा जपणारा एकमेव महाराष्ट्रीयन लोक संगीत व लोक नृत्याचा अनोखा कलाविष्कार कार्यक्रम सादर केला जाणार आहे. तर दि.१९ फेब्रुवारी२०२६ शिवजयंती रोजी सकाळी ११:३० वाजता देवी मंदिर कळंब येथून भव्य शिवजयंती मिरवणूक व महिलांची भव्य रॅली निघणार आहे. तरी शहरातील व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक अतुल कवडे,रोहण पारख, अमर चाऊस, पूजा धोकटे, संजय घुले यांनी केले आहे.

**उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे यांच्या पथकाची कारवाई**

# पांग्रीकाटे येथील शेतकऱ्यांच्या शेतातला दीड कोटीचा अफू जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या पांग्रीकाटे येथील दोन शेतकऱ्यांनी शेतात अफूची लागवड केल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली असता दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी संयुक्त कारवाई करीत १ कोटी ३२ लाख ९८ हजार ४०० रुपयांची १६४ किलो ९८० ग्रॅम अफू जप्त करण्यात आला.ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे,सिंदखेडराजा येथील नायब तहसीलदार संदीप बंगाळे,राज्य उत्पादन शुल्कचे





दुय्यम निबंधक आनंद शिंदे यांनी साखरखेर्डा,गोरेगाव, पांग्रीकाटे या भागात पाहणी करीत असताना पांग्रीकाटे येथील १४८ गट नंबर मधील भागवत सदाशिव काटे आणि विशाल रमेश काटे यांच्या गट नंबर १२८ मध्ये अफू ( खसखस ) पिकांची लागवड केल्याची माहिती पोलिसांना मिळाली.पोलीसांनी संयुक्त पथक तयार करून दिनांक १६ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष शेतात गेले असता भागवत काटे हा अफूला पाणी देत असल्याचे आढळून आले,त्यांच्या शेतातील अफू उपटून जमा केली असता १०७ किलो ६६० ग्राम वजन भरले असून बाजारात त्याची किंमत ८६ लाख १२ हजार ८०० आहे . तर विशाल रमेश काटे यांच्या शेतात जप्त करण्यात आलेली अफू ५७ किलो ३२० असून त्याची किंमत ४५ लाख ८५ हजार ६०० रुपये असून ही संयुक्त कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे,अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली , उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे,ठाणेदार गजानन करेवाड,नायब तहसीलदार संदीप बंगाळे,राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आनंद शिंदे,ग्राम महसूल अधिकारी आनंद राजपूत,कृषी सहायक छबुलाल कोल्हे, पोलीस उपनिरीक्षक गणेश कड,पोलीस हेड कॉन्स्टेबल डिगांबर चव्हाण,सुनील देशमुख , उमेश घुगे , किशोर बोरे,आकाश काळदाते,चालक सलिम गवळी यांनी केली.पोलीस उपनिरीक्षक गणेश कड यांनी दिलेल्या तंक्रारी वरुन कलम ८(क),१८ ( क ),एन डी,टी एस क्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास साखरखेर्डा पोलीस करीत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अतिवृष्टीतून ठाणे जिल्हा बाद; राज्य शासनाचा अहवाल; ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधून संतापाची लाट

## भातपिकांचे मोठे नुकसान असूनही जिल्ह्याचा समावेश नाही; फेरविचार करून नुकसानभरपाई देण्याची शेतकरी संघटनांची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सन २०२५ मध्ये राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक जिल्ह्यांतील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नुकसानग्रस्त जिल्ह्यांचा अहवाल संबंधित विभागांना सादर केला आहे. मात्र या अहवालात ठाणे जिल्ह्याचा अंशतःही समावेश करण्यात आलेला नसल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. भिवंडी तालुक्यासह ठाणे जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे विशेषतः भातपिकांचे मोठे नुकसान झाल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. अनेक ठिकाणी शेती पूर्णपणे पाण्याखाली गेली, तर काही भागांत उभे पीक सडल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. अतिवृष्टीमुळे उत्पादन घटले असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. अशा परिस्थितीतही शासनाच्या अहवालात ठाणे जिल्ह्याचा समावेश न केल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकसान असूनही आपत्तीग्रस्त जिल्ह्यांच्या यादीत नाव नसल्याने शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीपासून वंचित राहावे लागणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या निर्णयाविरोधात शेतकरी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त करत शासनाने तातडीने फेरविचार करून ठाणे जिल्ह्याचा समावेश करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये सरकारला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशाराही शेतकरी संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे.

**अतिवृष्टी होऊनही सरकार ठाणे जिल्ह्याला आपत्तीग्रस्त घोषित करत नसेल, तर हा निर्णय अन्यायकारक आहे. आपत्तीग्रस्त घोषित न केल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे.**
**– बाधित शेतकरी शिवाजी राऊत**

तसेच, नुकसानभरपाई देताना कोणते निकष लावले जाणार, पंचनामे योग्य प्रकारे झाले का, याबाबत स्पष्टता देण्याची मागणीही शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. कोकणातील इतर बाधित जिल्ह्यांसह ठाणे जिल्ह्यालाही आपत्तीग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

---

# धाराशिवचे नूतन शिक्षणाधिकारी (जि. प. प्राथमिक) डॉ. रवींद्र खंदारे यांचे स्वागत व दिनदर्शिका भेट संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : धाराशिवच्या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी पदी नुकतेच रुजू झालेले डॉ. रवींद्र खंदारे यांचे स्वागत राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्राच्या वतीने करण्यात आले. उपक्रम शील,उच्च विद्या विभूषित व डॉक्टरेट प्राप्त केलेले शिक्षण अधिकारी धाराशिव जिल्ह्याला लाभल्याबद्दल संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा आणखी सुधारण्यासाठी नक्कीच मदत होईल असा आशावाद व्यक्त केला. जिल्ह्यातील शिक्षकांचे व शिक्षणाचे अनेक प्रश्न प्रलंबित असून केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक व पदवीधर पदोन्नती सारखे जिव्हाळ्याचे विषय तसेच विद्यार्थ्यांच्या समाजकल्याण शिष्यवृत्ती योजना सह अनेक प्रश्न सोडवण्यासाठी आपले कौशल्य वापरुन मार्ग काढणे आवश्यक असल्याचे मत यावेळी पदाधिकार्यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या दिनदर्शिका यावेळी सन्माननीय साहेबांना भेट दिली.या दिनदर्शिकेचे वैशिष्ट्य म्हणजे महाजोती मार्फत राबविण्यात येणार्या सर्व शिष्यवृत्ती योजनांची माहिती देण्यात आली आहे.

कार्यक्रमास राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने, उपाध्यक्ष श्री सुखदेव भालेकर, जिल्हा अध्यक्ष श्री अनंत फलसुंदर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख श्री पंकज कासार, श्री विशाल जाधव, श्री कल्याण कुंभार यांच्या सह पदाधिकारी उपस्थित होते.

# कळंब येथे लहुजी साळवे यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : आद्यक्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या १४५ व्या पुण्यतिथीनिमित्त कळंब येथील साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेस श्री. संजय घुले यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संजय घुले, तिर्थकर , सिकंदर वैरागे, राहुल कांबळे, रोहित कसबे, धनंजय ताटे, यांनी लहुजी वस्ताद साळवे यांच्या जिवन चरित्र विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी लखन ताटे, साईनाथ कांबळे, शंकर ताटे, चिमण्या ताटे, तानाजी वैरागे, करण कसबे, यांच्या सह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार धनंजय ताटे यांनी मानले.

---

# वागदरी येथील शिवजन्मोत्सव मध्यवर्ती तरुण मंडळ अध्यक्षपदी गोपी सावंत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : श्री. छत्रपती शिवाजी महाराज शिवजन्मोत्सव मध्यवर्ती तरुण मंडळ जयंती उत्सव २०२६ ची कार्यकारणी निवड करण्यात आली.

निवड करण्यात आलेली कार्यकारणी खालील प्रमाणे:

मंडळाचे अध्यक्ष: श्री. गोपी सावंत.

उपाध्यक्ष: श्री.अमोल माने.

सचिव: श्री. नितीन हेबळे.

सहसचिव: श्री. समर्थ सुरवसे.

खजिनदार: श्री. राम मोरे.

या कार्यकारणी निवडी वेळी सुनिल सावंत, महादेव सोनकवडे. श्याम बाबर राज शिंदे, श्री. स्वामीराव यादव, श्री. राज यादव, श्री. श्याम बाबर, श्री. अक्षय सावंत, श्री. लखन मोरे, श्री. विशाल बापू सावंत, श्री. प्रशांत शिंदे, श्री. मनोज शिंदे, श्री. आकाश कणसे, श्री.विनोद सावंत, श्री अभिजीत सावंत, श्री. समर्थ सावंत, महादेव गायकवाड, परमेश्वर हेबळे ,प्रसाद सावंत ,गट्टू मोरे ,सचिन शिंदे ,धर्मा माने, गणेश सावंत यांच्यासह असंख्य समाज बांधव उपस्थित होते. अशाप्रकारे अतिशय उत्साहामध्ये शिवजन्मोत्सव तरुण मंडळाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

# दुधनी शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील कुसापूर केंद्रांतर्गत येथे वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, गीत व सांस्कृतिक कला सादर करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने करण्यात आली. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, लोकनृत्य, सामाजिक विषयांवर आधारित लघुनाटिका आणि समूहगायन सादर केले. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून स्वच्छता, शिक्षणाचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धन यांसारखे सामाजिक संदेश प्रभावीपणे मांडले. या प्रसंगी भिवंडी तालुक्याचे माजी सभापती शांतारामदादा पाटील, ठाणे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा दिपालीताई पाटील, दुधनी ग्रामपंचायतीचे सरपंच लक्ष्मणदादा पाटील, दाभाड केंद्राचे केंद्रप्रमुख श्यामसुंदर दोंदे सर, तसेच यशोदा आई यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

याशिवाय शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा रेश्माताई मलेकर, उपाध्यक्ष नरेशभाऊ जाधव, कुसापूर केंद्राचे माजी केंद्रप्रमुख नरेश भोईर सर, ठाणे व पालघर शिक्षक पतपेढीचे अध्यक्ष प्रशांतजी घागस सर, उपसरपंच हर्षदाताई पाटील, पोलीस पाटील नम्रताताई भवर, शाळेचे मुख्याध्यापक गजानन गायकवाड, सहकारी शिक्षक पुनम गायकवाड व सतीश वाडीयार, तसेच कुसापूर व पाच्छापूर केंद्रातील शिक्षक, पालकवर्ग आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांच्या नृत्य–गायनातून सामाजिक संदेश; मान्यवरांच्या उपस्थितीत वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात**

कार्यक्रमाचे आयोजन सुबक पद्धतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने शाळा प्रशासनाने विशेष प्रयत्न केले. मुख्याध्यापक गजानन गायकवाड यांनी प्रास्ताविकात शाळेच्या शैक्षणिक व उपक्रमशील वाटचालीचा आढावा घेतला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, शिस्त आणि सांस्कृतिक रंगत यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळाला. दुधनी शाळेचा हा वार्षिक सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

---

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १५७ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न**

# समाजात शांतता प्रस्थापित होण्यासाठी व्यवहारात समता पाळली पाहिजे : बी. बी. मेश्राम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने बुद्ध तत्त्वज्ञानामुळे जग युद्धापासून दूर व शांततेच्या जवळ येईल. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ७३ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १५७ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे १५ फेब्रुवारी २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, १५ फेब्रुवारी १९५३ ला नवी दिल्ली येथे इंडो जपानी सांस्कृतिक संघटनेचे चिटणीस मूर्ती यांच्या सापत्नीक सत्कार प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दोन महत्त्वपूर्ण संदेश दिले होते त्यापैकी एक म्हणजे बुद्धाचा स्वीकार करणे होय. नाही तर दुसरा म्हणजे नाईलाजाने का होईना मार्क्स चा स्वीकार करणे होय. बुद्धाची व्यापकता स्पष्ट करताना बुद्धतत्त्वज्ञानामुळे जग युद्धापासून दूर तर शांततेच्या जवळ येईल, असे प्रतिपादन केले होते. बुद्धाला खऱ्या अर्थाने स्वीकार करायचा असेल तर विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या तत्वांचा अंगीकार करून आपल्या जीवनाला चारित्र्यसंपन्न बनविले पाहिजे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे केलेल्या आव्हानानुसार सर्व बौद्धांनी प्रत्येक रविवारी बुद्ध विहारात जाऊन समता स्थापित करण्यासाठी आवश्यक उपायोजनावर चर्चा केली पाहिजे. कारण माणसा माणसातील संबंध प्रेम, करूणा या तत्त्वानुसार जोडणाऱ्या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत हा समता आहे. म्हणून आपण समतायुक्त समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक उपायोजनांची अंमलबजावणी केली पाहिजे. करीता भारतीय समाजात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून आपण या विषयावर चर्चा करीत आहोत.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते सुरेश खाडवे म्हणाले की, विज्ञानाने खूप प्रगती केली असली तरी मानवी मनातील द्वेष, मत्सर, हिंसा याद्वारे निष्पाप लोकांचे बळी जातात. दोन देशातील वाद बंदूकीऐवजी संवादाने सोडविले पाहिजेत. शांतता प्रिय समाज निर्माण करण्यासाठी युद्धाची आग नको, तर प्रेमाचा धागा हवा.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, बुद्ध विश्व प्रेमाचे प्रतीक आहे. असा उदात्त धर्म, धम्म बाबासाहेबांनी आपणास दिलेला आहे. सर्व गुण संपन्न बुद्धाकडे सुंदरता आणि प्रतिभा ओतप्रोत भरलेली होती. ज्यामुळे आदर्श व्यक्ती निर्माणाचे ते उत्तुंग व्यक्तिमत्व होते. परिपूर्ण विकसित व्यक्तिमत्व म्हणजे बुद्ध होय. आपण मानवी जीवनाकडे व्यापक दृष्टिकोनातून बघितले पाहिजे.

याप्रसंगी सुभाष वानखेडे म्हणाले की, बुद्धाने जगाला प्रतित्यसमुतपाद, कार्यकारणभाव यासह शांतीचे तत्वज्ञान दिले. स्वार्थापोटी आवश्यकतेपेक्षा जास्त संचय करू नये. भीम राज बोर्डे म्हणाले की, बाबासाहेबांनी दाखविलेल्या धम्माच्या मार्गाने आपण गेलो तर आपणास युद्धाची गरजच भासणार नाही. राहुल मेश्राम म्हणाले की, विविध धर्माच्या लोकांनी बाबासाहेबांशी धर्मांतराच्या अनुषंगाने संपर्क केला होता परंतु त्यांनी कुठल्याही आमिषाला बळी न पडता बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला. माणूस हा बुद्ध धम्माचा केंद्रबिंदू आहे. श्रीलंकेत विहारात येण्यासाठी बोलवावे लागत नाही तर आपणाकडे मात्र बोलावल्यावर सुद्धा उपासक फिरकताना दिसत नाहीत. उद्योजक वीरेंद्र गायकवाड म्हणाले की, छावणीच्या गड्डी गुड्डम येथे कार्यशाळा आयोजित करून वाघासारखे बणा म्हणजे, तुमच्या वाटेला कोणी जाणार नाही? याची जाणीव करून देण्यात आली होती. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, द्वितीय विश्व युद्धात अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरावर अणुबॉम्ब टाकून बेचिराख केल्यावर सुद्धा जपानने युद्ध नाकारून बुद्धाचा स्वीकार करून तंत्रज्ञानाने विकास करून दाखविला आहे. त्यामुळे जगाने भारताकडून बुद्ध स्वीकारला आहे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक ड. विलास रामटेके तर प्रा. विलास कटारे यांनी आभार व्यक्त केले. अशाप्रकारे हर्षोल्हासात साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई : तहसिलदार सचिन लंगुटे

## २२ तराफे केले नष्ट








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भीमा नदीपात्रात अवैध वाळू उपसा व वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे २२ थर्माकोलचे तराफे महसूल प्रशासनाच्या पथकाकडून नष्ट करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. भीमा नदी पात्रात पंढरपूर शहर व भुटूंबरे दरम्यान वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे २२ थर्माकोलचे तराफे मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी नष्ट केले आहेत.

या कारवाई करण्यामध्ये मंडळ अधिकारी पंढरपूर विजय शिवशरण बाळासाहेब कदम, रिंगण चव्हाण व तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी, अमर पाटील, प्रमोद खंडागळे, महेश कुमार सावंत, संजय खंडागळे, गणेश पिसे, किरण बाडीवाले, विराज लोटेकर, सुमित जाधव, पियुष भोसले, संदीप शिनगारे, आनंद सोनवणे, रविकिरण लोखंडे, नागनाथ खांडेकर, राहुल घुटाळ, रामदास खंदारे, गणेश तांमोर, विवेक चव्हाण, नवनाथ मरे, अब्दुलसलीम चांदकोटे, मंगेश बनसोडे हे सहभागी होते.

# शिवजयंती दिनी 'मेरा युवा भारत' मेगा पदयात्रेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे, (जिमाका वृत्तसेवा) : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण राज्यभरात 'माय भारत' (मेरा युवा भारत) मेगा पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांनी त्याबाबत काटेकोर नियोजन करून उपक्रम यशस्वी करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

### पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांनी पदयात्रेचे काटेकोर नियोजन करून यशस्वी करावी : विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले की, भारत सरकारचे युवक व क्रीडा मंत्रालय आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शिवजयंतीनिमित्त या पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, शिक्षण विभाग तसेच आरोग्य विभागासह अन्य सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने तयारी करून हा उपक्रम यशस्वी करावा. विभागात सर्व जिल्ह्यात पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून मुख्य कार्यक्रम सातारा येथे आयोजित करण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले, या पदयात्रेमध्ये अधिकाधिक विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी शिक्षण विभागाने शैक्षणिक संस्थांशी तात्काळ समन्वय साधून नियोजन करावे. पदयात्रेत अधिकाधिक लोकप्रतिनिधी, विविध शासकीय अधिकारी, महिला, युवक आदी सहभागी व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट आणि गाईड आदीमधील विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून सकाळी लवकर पदयात्रा आयोजित करावी. मार्गावर आवश्यक तेथे पाण्याची, आरोग्य तपासणी, उपचारासाठी वैद्यकीय पथके, पुरेशा रुग्णवाहिका आदींची व्यवस्था करावी. लहान मुले येणार असतील तर त्यांची विशेष काळजी घ्यावी. आजारी मुले सहभागी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

आयोजित पदयात्रा ही केवळ औपचारिक मिरवणूक न राहता ती तरुण पिढीला महाराजांच्या विचारांशी जोडणारी, राष्ट्रप्रेम जागृत करणारी आणि स्वराज्याचा संदेश देणारी प्रेरणादायी चळवळ ठरावी, असेही डॉ. फुलकुंडवार यांनी सांगितले.

पोलीस विभागाने वाहतूक व्यवस्थापनाचा आराखडा करून योग्य ती अंमलबजावणी करावी अशा सूचना विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. फुलारी यांनी पोलीस दलाला दिल्या.

केंद्र शासनाच्या युवक कल्याण विभागामार्फत 'चूइहरीरीं' पोर्टलद्वारे सहभागी होण्याचे युवकांना आवाहन करण्यात आले आहे. पुणे विभागात पारंपारिक वेशभूषेत, ढोल-ताशा पथकांच्या गजरात आणि महाराजांच्या जयघोषात पदयात्रा काढण्यात येणार आहेत.

# राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांची हकालपट्टी करा : दिगंबर सुडके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





पंढरपूर/प्रतिनिधी : नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये मोहोळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, उमेश पाटील यांनी मोहोळ तालुक्यामध्ये राष्ट्रवादीचा एकही उमेदवार उभा केला नाही व त्यांनी भाजप व शिवसेनेच्या माध्यमातून निवडणूक लढवल्या आहेत. त्यामुळे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांचे हकलपट्टा करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे पंढरपूर शहराध्यक्ष दिगंबर शेळके यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे केली आहे. यामुळे आता पक्ष कोणती भूमिका घेणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून मोहोळ तालुक्यामध्ये निवडणूक लढवली, गरजेचे होते मात्र याकडे जिल्हा अध्यक्ष उमेश पाटील यांनी दुर्लक्ष करून भाजप शिवसेनेच्या माध्यमातून निवडणुका लढवल्या आहेत. मात्र आता त्यांना पराभवा पत्करावा लागला असल्याने. असल्याचे दिसून येत आहे. उमेश पाटील यांनी पक्षाचे निवडणूक लढवल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर सिस्टम अंगाची कारवाई करून त्यांची हकालपट्टी करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे पंढरपूरचे अध्यक्ष दिगंबर शेळके यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे केली आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. आता पक्ष कोणती भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

# रांजणी येथील जिल्हा परिषद शाळेत बालआनंद मेळावा उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




खामसवाडी:हनुमंत पाटुळे/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील रांजणी येथील जिल्हा परिषद शाळेत दि.१७फेब्रुवारी २०२६ रोजी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्धघाटन गावचे सरपंच राजाभाऊ आगरकर, उपसरपंच अन्सार शेख, शालेय समिती अध्यक्ष इलाही पटेल, तंटामुक्त अध्यक्ष मतीन पटेल, जानू मिया बागवान, इम्रान पठाण, श्याम पांनढवळे, राहुल पवार, लतीबपटेल, लहु गोरे,श्रावण सोनपारखे, भारत गोरे ,सय्यद मुजमील, मल्हारी पानढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्टॉल लावले होते. यामध्ये गावातील पालक, महिलांनी विद्यार्थ्यांच्या स्टॉलवर जाऊन विविध खाद्यपदार्थ खरेदी केले. शालेय विद्यार्थ्यांना आर्थिक ज्ञान यावे म्हणून आणि बाजाराची देवाण-घेवाण याचे ज्ञान यावे म्हणून हा बाल आनंद मेळावा आयोजित केला होता. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार गुरव, राम कांबळे, श्रीनिवास पवार, एजाज अली शेख, उमेश साळुंखे, रमा पाईक, इंदुमती गंगणे, ज्योती चित्ते. व शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. या बाल आनंद मेळाव्याचा विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी वस्तू खरेदी करुन आनंद घेतला.



# रोटरी क्लब अक्कलकोट येथे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. श्री. सुधीर लातुरे यांची सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट : रोटरी क्लब अक्कलकोट येथे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर (प्रांतपाल) रो. श्री. सुधीर लातुरे यांनी अधिकृत सदिच्छा भेट देत क्लबच्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी फर्स्ट लेडी रो. सौ. संगीता लातुरे, डी. जी. सेक्रेटरी रो. तापडिया तसेच असिस्टंट गव्हर्नर रो. श्री. सचिन चौधरी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष रो. गुरुशांतप्पा पाटील, सचिव रो. प्रदीप तोरस्कर, कोषाध्यक्ष रो. केदार नरोणे व सर्व रोटेरियन सदस्यांनी मान्यवरांचे उत्साहपूर्ण स्वागत केले. त्यानंतर आयोजित क्लोज डोअर मिटिंगमध्ये डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांनी क्लबतर्फे राबविण्यात आलेल्या विविध सेवा व सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती जाणून घेतली. क्लबचे अहवाल तपासून कामकाजाचा आढावा घेत बोर्ड ऑफ डायरेक्टर सदस्यांशी संवाद साधला.

सार्वजनिक सभेला राष्ट्रगीताने सुरुवात झाली. अध्यक्षांनी प्रस्ताविक करत क्लबच्या सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी कार्याची माहिती उपस्थितांसमोर मांडली.

### सामाजिक उपक्रमांचे कौतुक; ग्लोबल ग्रँट प्रकल्पाबाबत मार्गदर्शन

कार्यक्रमादरम्यान नेशन बिल्डर अवॉर्ड श्री. हरदास सर व श्री. देसाई सर यांना, तर व्होकेशनल अवॉर्ड श्री. रायप्पा बिराजदार व श्री. अब्दुलरजाक पठाण यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. पुरस्कारार्थ्यांच्या कार्याचे उपस्थितांनी कौतुक केले.

या कार्यक्रमामध्ये अक्कलकोट रोटरी क्लब पुरस्कृत मालिकार्जुन इट्रॅक्ट क्लब किणी,याची नवीन मंजुरी रोटरी इंटरनॅशनल कडून मिळालेली आहे त्याचे रोटरी इंटरनॅशनल चार्टर क्लब मेंटर रो. श्री.तुळजापूरे यांना डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्री सुधीर लातुरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले,

मार्गदर्शनपर भाषणात रो. श्री. सुधीर लातुरे यांनी रोटरीच्या सेवा कार्याची उद्दिष्टे, समाजातील योगदान आणि सदस्यांची भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अक्कलकोट येथे राबविण्यात येणाऱ्या ग्लोबल ग्रँट प्रकल्पाबाबत माहिती देत भविष्यात अधिक प्रभावी सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. संघटन बळकट करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. श्री. नितीन पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन रो. श्री. प्रदीप तोरस्कर यांनी मानले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

**न्यायालयाच्या आदेशाने पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी फिर्यादीस केले सुपूर्द**

# करमाळा पोलीस ठाण्याचे मोठी कारवाई, चोरीतील २.१० लाखाचा सोन्याचा मुद्देमाल हस्तगत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल चोरीच्या गोण्याचा यशस्वी तपास करत पोलिसांनी सुमारे दोन लाख दहा हजार रुपये किमतीचा सोन्याचा मुद्देमाल हस्तगत करून न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्यादीस परत दिला या कामगिरीमुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

गुण क्रमांक ७८८/२०२४ भा. न्या. संहिता कलम ३०५ (अ) अन्वये दाखल असलेल्या प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलिसांनी संबंध ति आरोपी रामेश्वर जंगल्या भोसले, (पांडेगव्हाण तालुका आष्टी जिल्हा बीड) यास ताब्यात घेतले सखोल चौकशीनंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली देत चोरी केलेल्या सोन्याचा मुद्देमाल स्वतःच्या ताब्यात असल्याची सांगितले त्यानुसार पोलिसांनी सात ग्रॅम साधना सोन्याची ठुशी, वाढल्या मोजण्यातील सोन्याची कानातील दोन फुले, असा एकूण दोन लाख दहा हजार किमतीचा ऐवज, जप्त केला.

सदर मुद्देमाल हा न्यायालयाच्या आदेशानुसार सदर मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्यादी अभिजीत जीवन सरडे राहणार कंदर तालुका करमाळा, यांना परत म** मिळाला चे फिर्यादी यांनी, यांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी सोलापूर ग्रामीण व सह पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर सोलापूर ग्रामीण तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा व्हीएस. करमाळा, उपविभागीय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजीत माने यांच्या नेतृत्वाखाली एपीआय गिरीश मस्के यांच्या पथकाने कर्मचाऱ्यांनी केली.

दुसऱ्या गुन्ह्यातील ही सोन्याची अंगठी परत दरम्यान करमाळा पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ९२६/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३, चे कलम ७४ ७५(२) २१६(२) अन्वये दाखल गुन्ह्यातील मुद्देमाल ही परत करण्यात आला, चार ग्रॅम ९९० मिली, वजनाची सोन्याची पिढीची अंगठी, या अतिरिक्त सत्र न्यायदंड अधिकाऱ्यांनी फिर्यादी मगनाबी हसन शेख, राहणार करमाळा तालुका करमाळा जिल्हा सोलापूर, यांना सुपूर्द करण्यात आली. पोलीस प्रशासन नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यास कटिबद्ध असून गुन्हेगाराविरुद्ध कठोर कारवाई करण्यास सुद्धा असल्याचे सुरूच राहणार आहे असे सांगितले.